0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-**
१) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दि.०१/०३/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल.
२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१४/२०१२/जा.११४, दिनांक ०३/०३/२०१२ व १२/०३/२०१२.
३) मे. त्रिमुर्ती वेअर हाऊस चे मालक यांचे दि. ०७/०३/२०१२ रोजीचे निवेदन.
४) मे. भेरुलाल राधेशाम भंडारी, मे. बालाजी ट्रेडर्स, मे. कुसुम एजन्सी, मे. महेश ॲग्री एक्सीम, मे. आर. व्ही. फुड प्रॉडक्ट, मे. करोडीया एक्स्पोर्ट प्रा.लि. व मे. केशव ट्रेडींग यांचे दि.२०/०३/२०१२ रोजीचे स्वतंत्र निवेदने व त्यासोबतचे कागदपत्रे.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१४/२०१२/जा. २४८
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इशुरस इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक : १९/०४/२०१२.

## आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अवये)

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक २७/०२/२०१२ रोजी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना खात्रीलायक बातमी मिळाली की, शिळ पनवेल मार्गावरील पिंपरी पाडा येथील कर्म लॉजिस्टिक मधील विविध गोदामात कडधान्याचा विनापरवाना साठा करुन व्यवसाय केला जात असल्याचे मिळालेल्या बातमीची खातरजमा करण्यासाठी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, हे पथकासमवेत कर्म लॉजिस्टिक जवळील असलेल्या गल्लीत पंचांसमवेत काही अंतर पायी चालत गेले. अंदाजे पाच मिनिटे चालत गेल्यावर रस्त्याच्या डाव्या बाजुस लोखंडी शटर लावलेल्या गाळयांची रांग अधिकाऱ्यांना दिसली. तद्नंतर पथकाने शटरच्या बाहेरील जागेची पाहणी केली असता कडधान्य सांडल्याचे दिसुन आले. सदर गाळा कोणाच्या मालकीचा व त्यामध्ये कसला साठा आहे याबाबत गाळयापासुन काही अंतरावर उभ्या असलेल्या मजुराकडे चौकशी केली असता त्याने याबाबत त्याला माहिती नसल्याचे सांगितले. त्यानंतर काही अंतरावर असलेल्या उघडया गाळयामध्ये जावून अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष चौकशी केली असता सदरचा बंद असलेला गाळा हा जयसिंग बाळु बाबर, त्रिमुर्ती वेअर हाऊस यांचा असल्याची माहिती मिळाली. अधिकाऱ्यांनी

भ्रमणध्वनीवर जयसिंग बाळु बाबर यांना संपर्क साधुन घटनास्थळी हजर होणेबाबत सांगितले असता साधारण एक तासाच्या कालावधीनंतर ते घटनास्थळी हजर झाले.

अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष जयसिंग बाळू बाबर यांना गाळा उघडून दाखविण्याबाबत सांगितले त्यानुसार त्यांनी गाळा उघडून दाखविला. अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष सदर गाळयामध्ये प्रवेश केला असता त्यामध्ये एक टेबल दोन खुर्च्या ठेवलेल्या होत्या, तसेच एका बाजुस कडधान्याने भरलेल्या बाचक्यांची थप्पी रचलेली दिसुन आली. अधिकाऱ्यांनी जयसिंग बाळु बाबर यांना गाळयामध्ये कसला साठा आहे याबाबत विचारणा केली असता त्यांनी वेगवेगळया कडधान्याचा साठा असल्याचे सांगितले. तद्नंतर त्यांचेकडे सखोल चौकशी केली असता त्यांनी सदरचे नऊ गाळे जागा मालक मोहम्मद युसुफलाल मोहम्मद अन्सारी यांच्याकडून अकरा महिण्याच्या कराराने मासिक रुपये एक लाख व अनामत रक्कम रुपये दोन लाख याप्रमाणे माहे जुलै २०११ पासुन भाडेतत्वावर घेतले असल्याचे सांगितले. सदर गाळयामध्ये जयसिंग बाळू बाबर हे त्यांचे स्वतःच्या मे. त्रिमुर्ती वेअर हाऊस या नावाने विविध व्यापाऱ्यांच्या कडधान्य साठयाची भाडेतत्वावर साठवणूक करण्याचा व्यवसाय करीत असल्याचे सांगितले. पन्नास किलो वजनाच्या प्रत्येक बाचक्यासाठी प्रतिमाह रुपये ४.५० व माल उतरवून तसेच चढविणे यासाठी प्रतिबाचका रुपये ४.०० असे भाडे आकारुन गरजु व्यापाऱ्यांचा साठा त्यांच्या गोदामात ठेवत असल्याचे पंचांसमक्ष अधिकाऱ्यांना सांगितले. तद्नंतर अधिकाऱ्यांनी जयसिंग बाळू बाबर यांना असा व्यवसाय करण्यासाठी आवश्यक परवाने घेतले आहे किंवा नाही असे विचारले असता त्यांनी गुमास्ता परवाना घेतला असल्याचे सांगुन या व्यतिरीक्त अन्य कोणतेही परवाने प्राप्त केले नसल्याचे त्यांनी पंचांसमक्ष सांगितले. अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष गुमास्ता परवाना पाहिला असता त्यावर क्रमांक ००६४८९७/सीई २३९३०, त्रिमुर्ती वेअर हाऊस, मालक- श्री जयसिंग बाळू बाबर अशी नोंद असल्याचे अधिकाऱ्यांना दिसुन आले. याशिवाय त्यावर प्लॉट नंबर सी ३२६, टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, श्वेता पॅलेस समोर, पावने गाव, नवी मुंबई असा पत्ता नमुद असुन सदरचा गुमास्ता परवाना दुकान निरीक्षक, नवी मुंबई यांनी १२/०३/२००० रोजी निर्गमित केला असुन तो दिनांक ३१/१२/२०१२ पर्यंत वैध आढळला. गुमास्ता परवान्यावरील पत्ता व घटनास्थळाचा पत्ता यात तफावत असल्याचे अधिकाऱ्यांनी आम्हा पचांसमक्ष जयसिंग बाळू बाबर यांना सांगितले असता त्यांनी याबाबत दुकान निरीक्षक, नवीमुंबई यांचेकडे मौखिक विचारणा केली असता पुढील नुतनीकरणावेळी परवान्यावर नविन पत्याची नोंद करण्यात येईल असे सांगितल्याचे त्यांनी आम्हा पंचासमक्ष जयसिंग बाळू बाबर यांना गाळयातील साठयाबाबत विचारले असता त्यांनी ९ गाळयांमध्ये एकुण ७ व्यापाऱ्यांचा त्यांच्या नावासमोर दर्शविलेला कडधान्याचा साठा भाडेतत्वावर ठेवला असल्याचे सांगितले ते पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | कंपनीचे नांव | साठा प्रकार | बाचक्यांची संख्या | साठा तपशिल(क्विं) |
|---|---|---|---|---|
| १ | मे. करोडीया एक्स्पोर्ट प्रा.लि. | उडीद | २४०० | ११९८.३० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | मे. पुना दालमिल (भवरलाल राधेशाम) | उडीद | १४४० | ७२०.६० |
| ३ | मे. आर. व्ही. फुड प्रॉडक्ट | उडीद | ८०० | ४०२ |
| ४ | मे. केशव ट्रेडींग कंपनी | तुर | ५२२८ | २६२७.७० |
| ५ | मे. कुसुम एजन्सी | तुर | ३२७३ | १६१३.३० |
| ६ | मे. बालाजी ट्रेडर्स | तुर | १६७ | ८७.८० |
| ७ | मे. महेश ॲग्री | मुग | १४५० | ७२९.१० |
| एकुण कडधान्याचा साठा | | | १४७५८ | ७३७८.८० |

अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष जयसिंग बाळू बाबर यांच्याकडे सदर व्यापाऱ्यांनी माल साठवणुकीसाठी कोणते कागदपत्र सादर केली असे विचारले असता त्यांनी सदर साठयाचे बिल ऑफ एन्ट्री फॉर होम कंन्झंपशन, चलनाची प्रत तसेच वजन काटयाची पावती अधिकाऱ्यांना सादर केली. याशिवाय माल साठवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यांकडून अन्य कोणतेही दस्ताऐवज त्यांना दिले जात नसल्याचे अधिकाऱ्यांना सांगितले. त्यानंतर अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष व जयसिंग बाळू बाबर यांचे समोर ९ लोखंडी शटर असलेल्या मात्र आतील बाजूस संपूर्णतः एकत्रीत मोठया गाळयातील साठयाची मोजदाद केली असता ती वर नमुद केल्याप्रमाणे आढळली. अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष घटनास्थळी याबाबतचा जयसिंग बाळू बाबर यांचा जबाब नोंदवून घेण्यात आला तसेच रितसर पंचनामा करुन वरील नमुद गोदामामधील संपूर्ण साठा पुढील तपासणीच्या अधिन राहुन जप्त केला.

अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष जप्त साठयाचा सुपूर्दनामा लिहून सर्व साठा प्रकरणात पुढील आदेश होईपर्यंत जसा आहे तशा स्थितीत जतन करुन ठेवण्याबाबत तसेच सदर साठयाची कोणत्याही कारणासाठी घटनास्थळावरुन हलवाहलव न करण्याबाबत जयसिंग बाळू बाबर यांना सूचना देवून त्याच्या ताब्यात सुपूर्द केला तसेच दिलेल्या सुचनांचा भंग केल्यास जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ च्या तरतुदीमध्ये नमुद शिक्षेस व दंडास ते पात्र राहतील याचीही जाणीव करुन दिली.

तपासणीचे दरम्यान मे. त्रिमुर्ती वेअर हाऊस चे मालक जयसिंग बाळू बाबर यांनी गोदामात साठवणूक केलेल्या कडधान्याच्या साठा मालकांकडून प्राप्त साठयाचे बिल ऑफ एन्ट्री च्या काही छायांकित प्रती सादर केल्या. त्यापैकी १) मे. पुना दालमिल यांच्या साठयाचे बिल ऑफ एन्ट्रीच्या प्रती उपलब्ध नाहीत. २) मे. करोडीया एक्स्पोर्ट प्रा.लि. या कंपनीने दिनांक ७/१०/२०११ रोजी १२०१.६६ क्विंटल उडीदचा साठा आयात केल्याचे बिल ऑफ एन्ट्रीज वरुन दिसुन येते, तसेच सदर गोदामामध्ये तपासणीचे वेळी त्यांचा ११९८.३० क्विंटल उडीदचा साठा आढळून आलेला आहे. ३) मे. आर व्ही फुड प्रॉडक्ट या कंपनीने दिनांक १९/१०/२०११ रोजी ७२०.५३ क्विंटल उडीदचा साठा आयात केल्याचे बिल ऑफ एन्ट्रीज वरुन दिसुन येते, तसेच सदर गोदामामध्ये तपासणीचे वेळी त्यांचा ४०२ क्विंटल उडीदचा साठा आढळून आलेला आहे. ४) मे. केशव ट्रेडींग कंपनीने दिनांक १२/१२/२०११,

0004
१३/१२/२०११ व २७/१२/२०११ रोजी तीन बिल ऑफ एन्ट्री नुसार एकुण ३५९०.७२ क्विंटल तुर चा साठा आयात केल्याचे दिसुन येते, तसेच सदर गोदामामध्ये तपासणीचे वेळी त्यांचा २६२७.७० क्विंटल तुर चा साठा आढळून आलेला आहे. ५) मे. कुसुम एजन्सी या कंपनीने दिनांक २८/१२/२०११ रोजी २४०० क्विंटल तुर चा साठा आयात केल्याचे दिसुन येते, तसेच सदर गोदामामध्ये तपासणीचे वेळी १६१३.३० क्विंटल तुर चा साठा आढळून आलेला आहे. ६) मे. बालाजी ट्रेडर्स व मे. महेश ॲग्री या दोन्ही कंपनीने अनुक्रमे दिनांक ३१/०१/२०१२ व २७/०१/२०१२ रोजी ११९३.०५ (तुर) व ११५० (मुग) क्विंटल साठा आयात केल्याचे दिसुन येते, तसेच सदर गोदामामध्ये तपासणीचे वेळी त्यांचा अनुक्रमे ८७.८ व ७२९.१० क्विंटल साठा आढळून आलेला आहे. ७) घटनास्थळी गोदामामध्ये आयातदारांनी या कार्यालयास सादर केलेले मासिक विवरणपत्र उपलब्ध नसल्याचे आढळुन आले. ८) तपासणीमध्ये सदर गोदामामध्ये काही कंपन्यांचे आढळून आलेल्या बिल ऑफ एन्ट्री च्या छायांकित प्रतींवरील नमुद साठा व प्रत्यक्षात गोदामामधील साठा यामध्ये तफावत असुन सदरच्या तफावतीनुसार उर्वरीत साठयाचे तपशिल तपासणीचे वेळेस उपलब्ध झाले नाही.

वरील नमुद साठयाचे तपशिलाचे अवलोकन केले असता मे करोडीया एक्स्पोर्ट प्रा.लि. व मे. आर व्ही फुड प्रॉडक्ट यांचा कडधान्याचा साठा सुमारे ५ महिन्यांपासुन, मे. केशव ट्रेडिंग कंपनी यांचा सुमारे ३ महिन्यांपासुन, मे. कुसुम एजन्सी यांचा सुमारे २ महिन्यांपासुन नमुद गोदामावर साठवणूक केल्याचे आढळून येत आहे. यावरुन नमुद साठा हा साठेबाजीच्या उद्देशाने साठवणूक केल्याचे सकृतदर्शनी दिसुन येत आहे.

उपरोक्त नमुद जप्त करण्यात आलेला कडधान्याचा साठा हा आयातदार यांच्या गोदामात साठवणूक केलेला नसुन तो मे. त्रिमुर्ती वेअर हाऊस, प्लॉट नं ४० ते ४८, सर्व्हे नं ७४, एकता नगरी, ओल्ड मुंब्रा तळोजा रोड, पिंपरी, नवी मुंबई या ठिकाणी असलेल्या जयसिंग बाळु बाबर यांच्या गोदामात साठवणुक केल्याचे आढळुन आले आहे. मे. त्रिमुर्ती वेअर हाऊस चे मालक जयसिंग बाळु बाबर यांचा कडधान्य या जीवनावश्यक वस्तुंच्या साठवणुकीचा व्यवसाय असुन त्यांनी त्यांच्या नमुद गोदामावर महाराष्ट्र शेडयुल्ड कमोडिटीज होलसेल डिलर्स लायसन्सिंग ऑर्डर, १९९८ अन्वये साठवणुकीकरीता परवाना घेतला नसल्याचे तसेच त्याकरीता अर्जही केला नसल्याचे तसेच घटनास्थळी मे. त्रिमुर्ती वेअर हाऊस चे मालक व आयातदार कंपनी यांच्या मधील साठवणुकीबाबतचा करारनामाही उपलब्ध नसल्याचे आढळून आले आहे. ही बाब गंभीर आहे.

अशाप्रकारे मे. त्रिमुर्ती वेअर हाऊस, प्लॉट नं ४० ते ४८, सर्व्हे नं ७४, एकता नगरी, ओल्ड मुंब्रा तळोजा रोड, पिंपरी, नवी मुंबई चे मालक जयसिंग बाळु बाबर यांनी नमुद गोदामावर मोठया प्रमाणावर साठवणुक केलेला विनापरवाना कडधान्याचा साठा हा साठेबाजी करण्याच्या उद्देशाने असल्याचे दिसुन आल्याने तसेच दि महाराष्ट्र

होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर १९९८ व पर्यायाने जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ मधील तरतुदींचा भंग केल्याचे निदर्शनास आल्याने अधिकाऱ्यांनी पुढील तपासणीचे अधिन राहून उपरोक्त नमूद जीवनावश्यक वस्तूंचा साठा घटनास्थळीच जप्त केला आहे.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमल), मुंबई यांनी केलेली असून जीवनावश्यक वस्तुंमधील डाळी/कडधान्य या अनुसूचीत वस्तूंचा साठेबाजीच्या उद्देशाने साठवणूक केलेला विनापरवाना साठा शासनजमा का करण्यात येऊ नये ? याबाबत वाचावे क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली असून त्याकरीता या कार्यालयात दि.०७/०३/२०१२ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ०७/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. त्रिमुर्ती वेअर हाऊस चे मालक जयसिंग बाळू बाबर हे उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ३ अन्वये लेखी निवेदन सादर केले. सदर सुनावणीस साठा मालक यांच्यापैकी कोणीही उपस्थित राहिले नाहीत. सबब, सर्व साठा मालकांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक २०/०३/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २०/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. त्रिमुर्ती वेअर हाऊस चे मालक जयसिंग बाळू बाबर यांनी उपस्थित राहून मागील सुनावणीस दिलेले लेखी निवेदन कायम असल्याचे सांगितले. मे. पुना दालमिल यांच्या वतीने मे. भेरुलाल राधेशाम भंडारी यांनी प्रतिनिधी म्हणून नियुक्त केलेले मे. त्रिमुर्ती वेअर हाऊसचे मालक जयसिंग बाबर यांनी मे. भेरुलाल राधेशाम भंडारी या कंपनीचे लेखी निवेदन सादर केले. तसेच मे. बालाजी ट्रेडर्स चे मालक सुरेश रामकुमार बंग, मे. कुसुम एजन्सी यांच्या वतीने मॅनेजर शैलेश आर. पटेल, मे. महेश ॲग्री चे मालक हिरजी रामजी ठक्कर, मे. आर. व्ही. फुड प्रॉडक्ट यांच्या वतीने राजेश चंद्रा, मे. करोडीया एक्स्पोर्ट प्रा.लि. यांच्या वतीने मनोज सिंग सोलंके व मे. केशव ट्रेडींग कंपनीचे मालक भावेश मुलजीभाई कतीरा यांनी उपस्थित राहून साठा मालक अथवा त्यांचे वतीने प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधी म्हणून वाचावे क्र. ४ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केले.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

<u>युक्तिवाद</u> :-

दिनांक ०७/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. त्रिमुर्ती वेअर हाऊसचे मालक जयसिंग बाळू बाबर यांनी युक्तीवाद केला की, ते आयातदार नसुन गोडाऊन केअरटेकर असल्याचे सांगून आयातदारांचे

कोगीमधील साठ्याची हाताळणी करुन त्यांच्या नमुद वेअरहाऊसमध्ये सदर साठ्याची साठवणूक करुन प्रतीमहा व प्रती बाचके रुपये ५/- याप्रमाणे संबंधीतास भाडे आकारले जात असून खरेदी व वितरण याबाबतचे सर्व काम आयातदार स्वत: करीत असल्याचे सांगीतले. आपल्या कार्यालयास गरज पडल्यास संबंधीत आयातदारास सुनावणीमध्ये हजर करणार असल्याचे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २०/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. पुना दालमिल यांच्या वतीने मे. भेरुलाल राधेशाम भंडारी यांनी प्रतिनिधी म्हणून नियुक्त केलेले मे. त्रिमुर्ती वेअर हाऊसचे मालक जयसिंग बाबर यांनी मे. भेरुलाल राधेशाम भंडारी या कंपनीच्या वतीने युक्तीवाद केला की, त्यांचे जप्त करण्यात आलेला काळे उडीदचा साठा आयात केलेला असल्याचे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २०/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. बालाजी ट्रेडर्सचे मालक सुरेश रामकुमार बंग यांनी कंपनीच्या वतीने युक्तीवाद केला की, त्यांनी ५ कंटेनर मधून २४०० बाचक्यामधील १२० मे.टन तुर या कडधान्याचा साठा मे.ग्रेस कमोडीटीज लि., सिंगापूर या कंपनी कडून वैध असलेला आयात परवान्यावर आयात केला असल्याचे सांगीतले. सदरचा आयात केलेला साठा हा संबंधीत प्राधिकरणास दि.७/२/२०१२ रोजी आवश्यकती रक्कम अदा करुन व कागदपत्रांची पूर्तता करुन दि.८/२/२०१२ रोजी त्रिमुर्ती वेअरहाऊस येथे साठवणूक करण्यात आलेला आहे. तेव्हापासून सदरचा साठा हा गोदामामध्ये ठेवण्यात आलेला असून त्याची पुरावादर्शक कागदपत्रे सोबत जोडण्यात आली आहेत. त्यांच्या कंपनीचा आयात परवाना अथवा केंद्रशासनाच्या इतर तरतूदींचा भंग करण्याचा उद्देश नसल्याने जप्त करण्यात आलेला कडधान्याचा साठा हा तात्काळ मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २०/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. कुसुम एजन्सी यांच्या वतीने मॅनेजर शैलेश आर. पटेल यांनी कंपनीच्या वतीने युक्तीवाद केला की, त्यांना मे. कुसुम एजन्सीचे मालक सीराजभाई अब्दुलभाई खेतानी यांनी प्राधिकृत केले असून जप्त करण्यात आलेल्या साठ्याबाबतचे सर्व कागदपत्रे निवेदनासोबत सादर केली असल्याचे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २०/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. महेश ॲग्री चे मालक हिरजी रामजी ठक्कर यांनी कंपनीच्या वतीने युक्तीवाद केला की, त्यांनी निवेदनासोबत मे. त्रिमुर्ती वेअर हाऊसमध्ये जप्त करण्यात आलेल्या त्यांच्या साठ्याबाबतचे सर्व आवश्यक कागदपत्रे सादर केली असून जप्त करण्यात आलेला त्यांचा साठा हा सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन तात्काळ मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २०/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. आर. व्ही. फुड प्रॉडक्ट यांच्या वतीने राजेश चंद्रा यांनी कंपनीच्या वतीने युक्तीवाद केला की, त्यांचा जप्त करण्यात आलेला काळे उडीदचा १४४० बाचक्यांमधून मॅनमार्क येथून आयात केलेला आहे. त्यापैकी त्यांनी ६४० बाचक्यांची विक्री करुन उर्वरीत शिल्लक राहिलेल्या ८०० बाचक्यांमधील साठा त्रिमुर्ती वेअर हाऊस येथे साठवणूक केल्याचे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २०/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. करोडीया एक्स्पोर्ट प्रा.लि. यांच्या वतीने मनोज सिंग सोलंके यांनी कंपनीच्या वतीने युक्तीवाद केला की, त्यांना मे. कोराडीया एक्सपोर्ट प्रा.लि. चे संचालक राजेश शांतीला पंजवानी यांनी प्राधिकृत केले असून जप्त करण्यात आलेल्या साठ्याबाबतचे सर्व कागदपत्रे निवेदनासोबत सादर केली असल्याचे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २०/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. केशव ट्रेडींग कंपनीचे मालक भावेश मुलजीभाई कतीरा यांनी कंपनीच्या वतीने युक्तीवाद केला की, त्यांनी निवेदनासोबत मे. त्रिमुर्ती वेअर हाऊसमध्ये जप्त करण्यात आलेल्या त्यांच्या साठ्याबाबतचे सर्व आवश्यक कागदपत्रे सादर केली असून जप्त करण्यात आलेला त्यांचा साठा हा सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन तात्काळ मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

## निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक २७/०२/२०१२ रोजी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना खात्रीलायक बातमी मिळाली की, शिळ पनवेल मार्गावरील पिंपरी पाडा येथील कर्म लॉजिस्टिक मधील विविध गोदामात कडधान्याचा विनापरवाना साठा करुन व्यवसाय केला जात असल्याचे मिळालेल्या बातमीची खातरजमा करण्यासाठी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, हे पथकासमवेत कर्म लॉजिस्टिक जवळील असलेल्या गल्लीत पंचासमवेत काही अंतर पायी चालत उघडया गाळयामध्ये जावून अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष चौकशी केली असता संदरचा बंद असलेला गाळा हा जयसिंग बाळु बाबर, त्रिमुर्ती वेअर हाऊस यांचा असल्याची माहिती मिळाली. अधिकाऱ्यांनी भ्रमणध्वनीवर जयसिंग बाळु बाबर यांना संपर्क साधुन घटनास्थळी हजर होणेबाबत सांगितले असता साधारण एक तासाच्या कालावधीनंतर ते घटनास्थळी हजर झाले. अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष जयसिंग बाळू बाबर यांना गाळा उघडून दाखविण्याबाबत सांगितल्यानुसार त्यांनी गाळा उघडून दाखविला व अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष सदर गाळयामध्ये प्रवेश करुन जयसिंग बाळु बाबर यांनी सदर गाळयामध्ये साठवणूक केलेल्या वेगवेगळया

0008

कडधान्याचा साठ्याबाबत सखोल चौकशी केली असता, त्यांनी सदरचे नऊ गाळे जागा मालक मोहम्मद युसुफलाल मोहम्मद अन्सारी यांच्याकडून अकरा महिण्याच्या कराराने मासिक रुपये एक लाख व अनामत रक्कम रुपये दोन लाख याप्रमाणे माहे जुलै २०११ पासुन भाडेतत्वावर घेतले असल्याचे सांगितले. सदर गाळयामध्ये जयसिंग बाळू बाबर हे त्यांचे स्वतःच्या मे. त्रिमुर्ती वेअर हाऊस या नावाने विविध व्यापाऱ्यांच्या कडधान्य साठयाची भाडेतत्वावर साठवणूक करण्याचा व्यवसाय करीत असल्याचे सांगितले. पन्नास किलो वजनाच्या प्रत्येक बाचक्यासाठी प्रतिमाह रुपये ४.५० व माल उतरवून तसेच चढविणे यासाठी प्रतिबाचका रुपये ४.०० असे भाडे आकारुन गरजु व्यापाऱ्यांचा साठा त्यांच्या गोदामात ठेवत असल्याचे पंचांसमक्ष अधिकाऱ्यांना सांगितले. तद्नंतर अधिकाऱ्यांनी जयसिंग बाळू बाबर यांना असा व्यवसाय करण्यासाठी आवश्यक परवाने घेतले आहे किंवा नाही असे विचारले असता त्यांनी गुमास्ता परवाना घेतला असल्याचे सांगुन या व्यतिरीक्त अन्य कोणतेही परवाने प्राप्त केले नसल्याचे त्यांनी पंचांसमक्ष सांगितले. तद्नंतर जयसिंग बाळू बाबर यांना गाळयातील साठयाबाबत विचारले असता त्यांनी ९ गाळयांमध्ये एकुण ७ व्यापाऱ्यांचा एकूण १४७५८ बाचक्यांमधील उडीद, तुर व मुग या कडधान्यांचा एकूण ७३७८.८० क्विंटल साठा हा पंचांसमक्ष जागीच सीलबंद करुन तसा सुपुर्दनामा करुन मे त्रिमुर्ती वेअरहाऊसचे मालक जयसींग बाबर यांना सुपूर्द करुन जप्त करण्यात आलेला कडधान्यांचा साठा हा पुढील आदेशापर्यंत जैसेथे स्थितीत जतन करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२२२७ (अ), दिनांक २७ सप्टेंबर, २०११ अन्वये डाळी/कडधान्य व खाद्यतेल या अनुसुचित वस्तूंवर दिनांक ३०/०९/२०१२ पर्यंत निर्बंध आहेत. तथापी, "Central Government or State Government may direct the Importers to declare the receipts of stocks of these commodities and stocks retained by them" असे निर्देश दिलेले आहेत. तसेच शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २००८ अन्वये डाळीसाठी साठा मर्यादा व परवाना घेण्याची आवश्यकता याबाबत लागू केलेले निर्बंध हे आयात केलेल्या डाळींसाठी लागू राहणार नाहीत. त्यामुळे आयात केलेल्या डाळींच्या साठवणूक व प्रक्रियेसाठी व्यापाऱ्यांना परवाना घेण्याची आवश्यकता नाही. तथापी, त्यांनी आयात केलेल्या डाळीची खरेदी विक्री केल्यास यापुढे पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी/उपनियंत्रक शिधावाटप यांचेकडे रिटर्न्स भरावेत. रिटर्न्स भरतांना त्यामध्ये कंपनीच्या मालकाचे नांव, नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता, गोदामाचा पत्ता, सुरुवातीची शिल्लक, आयात केलेल्या डाळीचा तपशिल, विक्री केलेल्या डाळीचा तपशिल, शिल्लक साठा इत्यादींचा स्पष्ट उल्लेख असावा असे नमूद आहे. तसेच आयात डाळीची विक्री करताना पावतीवर " Imported pulses " असा स्पष्ट उल्लेख करावा व

CONTROLLER OF RATIONING HEAD OFFICE

आयात केलेल्या डाळीवरील क्रमांक व दिनांक पावतीवर स्पष्टपणे नमूद करुन बिल ऑफ एन्ट्रीची एक सत्य प्रत संबंधितांना द्यावी, असे नमूद आहे.

मे. बालाजी ट्रेडर्सचे मालक सुरेश रामकुमार बंग यांनी केलेल्या खुलाशात, त्यांनी ५ कंटेनर मधून २४०० बाचक्यामधील १२० मे. टन तुर या कडधान्याचा साठा मे. ग्रेस कमोडीटीज लि., सिंगापूर या कंपनीकडून वैध असलेल्या आयात परवान्यावर आयात केला असल्याचे सांगीतले. सदरचा आयात केलेला साठा हा संबंधीत प्राधिकरणास दि.०७/०२/२०१२ रोजी आवश्यकती रक्कम अदा करुन व कागदपत्रांची पूर्तता करुन दि.०८/०२/२०१२ रोजी त्रिमुर्ती वेअरहाऊस येथे साठवणूक करण्यात आला असल्याचे सांगितले. आयातदाराने आयात साठ्याबाबतची माहिती तसेच साठवणूकीबाबतची माहिती या कार्यालयास वेळोवेळी सादर करणे अभिप्रेत आहे. त्यानुषंगाने मे. बालाजी ट्रेडर्स यांनी या प्रकरणी जप्त करण्यात आलेला तुर या कडधान्यांचा साठा आयात केल्याबाबत या कार्यालयास मासिक विवरणपत्र सादर केल्याचे आढळून आले नाही. मे. बालाजी ट्रेडर्स यांनी आयात संबंधीचे सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, जप्त साठ्यापैकी तुर या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ५८७०४४३ दिनांक ३१/०१/२०१२ रोजी २४०० बाचक्यांमध्ये ११९८.०५ क्विंटल साठा आयात केल्याचे तसेच त्यापैकी दिनांक ०८/०२/२०१२ रोजी २३९७ बाचक्यांमधील ११९०.६० क्विंटल तुरच्या साठ्याची मे. त्रिमुर्ती वेअरहाऊसमध्ये साठवणूक केल्याचे दिसून येत आहे. आयात साठ्यापैकी विविध आस्थापनांना केलेल्या साठा विक्रीचे तपशिल म्हणून विक्री बिले सादर केले असून उर्वरित शिल्लक असलेला १६७ बाचक्यांमधील ८७.८० क्विंटल तुरचा साठा सद्य:स्थितीत नमूद गोदामावर शिल्लक असल्याचे सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत आहे. मे. बालाजी ट्रेडर्स यांनी उपरोक्त आयात साठ्याबाबतचे सर्व कायदेशीर कागदपत्रे सादर केले असल्यावरुन मे. बालाजी ट्रेडर्स यांचा आयात केलेला साठा वैध असल्याचे दिसून येते.

मे. कुसुम एजन्सी यांच्या वतीने मॅनेजर शैलेश आर. पटेल यांनी केलेल्या खुलाशात, कंपनीच्या वतीने त्यांना मे. कुसुम एजन्सीचे मालक सीराजभाई अब्दुलभाई खेतानी यांनी प्राधिकृत केले असून जप्त करण्यात आलेल्या साठ्याबाबतचे सर्व कागदपत्रे निवेदनासोबत सादर केली असल्याचे सांगीतले. मे कुसुम एजन्सी यांनी सादर केलेल्या आयात संबंधीचे कागदपत्रांचे अवलोकन केले असता, जप्त साठ्यापैकी तुर या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ५५९४२३५ दिनांक २८/१२/२०११ रोजी ४८०० बाचक्यांमध्ये २४०० क्विंटल साठा आयात केल्याचे तसेच त्यापैकी दिनांक ०५/०१/२०१२ रोजी ४७४३ बाचक्यांमधील २३३३.१० क्विंटल तुरच्या साठ्याची मे. त्रिमुर्ती वेअरहाऊसमध्ये साठवणूक केल्याचे दिसून येत आहे. आयात साठ्यापैकी विविध आस्थापनांना केलेल्या साठा विक्रीचे तपशिल म्हणून विक्री बिले सादर केले असून उर्वरित शिल्लक असलेला ३२७३

बाचक्यांमधील १६१३.३० क्विंटल तुरचा साठा सद्य:स्थितीत नमूद गोदामावर शिल्लक असल्याचे सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत आहे. आयातदाराने आयात साठ्याबाबतची माहिती तसेच साठवणूकीबाबतची माहिती या कार्यालयास वेळोवेळी सादर करणे अभिप्रेत आहे. त्यानुषंगाने मे. कुसुम एजन्सी यांनी या प्रकरणी जप्त करण्यात आलेला तुर या कडधान्यांचा साठा आयात केल्याबाबतचे या कार्यालयास तपासणी नंतर म्हणजेच दि.०७/०३/२०१२ रोजी मासिक विवरणपत्र सादर केल्याचे आढळून आले आहे. तथापि, मे. कुसुम एजन्सी यांनी उपरोक्त आयात साठ्याबाबतचे सर्व कायदेशीर कागदपत्रे सादर केले असल्यावरुन मे. कुसुम एजन्सी यांचा आयात केलेला साठा वैध असल्याचे दिसून येते.

मे. महेश ॲग्री चे मालक हिरजी रामजी ठक्कर यांनी कंपनीच्या वतीने केलेल्या खुलाशात, त्यांनी निवेदनासोबत मे. त्रिमुर्ती वेअर हाऊसमध्ये जप्त करण्यात आलेल्या त्यांच्या साठ्याबाबतचे सर्व आवश्यक कागदपत्रे सादर केली असून जप्त करण्यात आलेला त्यांचा साठा हा सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन तात्काळ मुक्त करण्याची विनंती केली आहे. मे. महेश ॲग्री यांनी सादर केलेल्या आयात संबंधीचे कागदपत्रांचे अवलोकन केले असता, जप्त साठ्यापैकी मुग या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ५३९९८५९ दिनांक १५/१/२०१२ रोजी १५०० बाचक्यांमध्ये ७५०.०० क्विंटल व बिल ऑफ एन्ट्री क्र. ५८४४५८३ दिनांक १७/२/२०१२ रोजी २३०० बाचक्यांमध्ये ११५०.०० क्विंटल असे मिळून ३८०० बाचक्यांमध्ये १९००.०० क्विंटल साठा आयात केल्याचे तसेच त्यापैकी दिनांक १७/१/२०१२ रोजी १५०० बाचक्यांमधील ७४८.९० क्विंटल व दि.१८/२/२०१२ रोजी २३०० बाचक्यांमधील ११५४.८० क्विंटल असा एकूण ३८०० बाचक्यांमधील १९०३.७० क्विंटल मुग या कडधान्याचा साठा मे. त्रिमुर्ती वेअरहाऊसमध्ये साठवणूक केल्याचे आढळून आले आहे. आयात साठ्यापैकी विविध आस्थापनांना केलेल्या साठा विक्रीचे तपशिल म्हणून विक्रीं बिले सादर केली असून विक्री केलेला साठा वजा जाता उर्वरित शिल्लक असलेला १४५० बाचक्यांमधील ७२९.१० क्विंटल मुगचा साठा सद्य:स्थितीत नमूद गोदामावर साठवणूक केले असल्याचे सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत आहे. आयातदाराने आयात साठ्याबाबतची माहिती तसेच साठवणूकीबाबतची माहिती या कार्यालयास वेळोवेळी सादर करणे अभिप्रेत आहे. परंतू मे. महेश ॲग्री यांनी या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुग या कडधान्यांचा साठा आयात केल्याबाबतचे या कार्यालयास मासिक विवरणपत्र सादर केले नसल्याचे आढळून आले आहे. तथापि, मे. महेश ॲग्री यांनी उपरोक्त आयात साठ्याबाबतच सादर केलेल्या कायदेशीर कागदपत्रांवरुन त्यांचा आयात केलेला साठा वैध असल्याचे दिसून येते.

मे. आर. व्ही. फुड प्रॉडक्ट यांच्या वतीने राजेश चंद्रा यांनी कंपनीच्या वतीने केलेल्या खुलाशात त्यांचा जप्त करण्यात आलेला उडीदचा १४४० बाचक्यांमधून मॅनमार्क येथून आयात केलेला आहे. त्यापैकी त्यांनी ६४०

बाचक्यांची विक्री करुन उर्वरीत शिल्लक राहिलेल्या ८०० बाचक्यांमधील साठा त्रिमुर्ती वेअर हाऊस येथे साठवणूक केल्याचे सांगीतले. मे. आर. व्ही. फुड प्रॉडक्ट यांनी सादर केलेल्या आयात संबंधीचे कागदपत्रांचे अवलोकन केले असता, जप्त साठ्यापैकी उडीद या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ४९६४४८२ दि. १९/१०/२०११ रोजी १४४० बाचक्यांमध्ये ७२०.६३ क्विंटल साठा आयात केल्याचे तसेच त्यापैकी दि. ११/११/२०११ रोजी १४४० बाचक्यांमधील ७१७.६० क्विंटल उडीद या कडधान्याचा साठा मे. त्रिमुर्ती वेअरहाऊसमध्ये साठवणूक केल्याचे आढळून आले आहे. आयात साठ्यापैकी विविध आस्थापनांना केलेल्या साठा विक्रीचे तपशिल म्हणून विक्री बिले सादर केली असून विक्री केलेला साठा वजा जाता उर्वरित शिल्लक असलेला ८०० बाचक्यांमधील ४०२.०० क्विंटल उडीदचा साठा सद्य:स्थितीत नमूद गोदामावर साठवणूक केले असल्याचे सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत आहे. आयातदाराने आयात साठ्याबाबतची माहिती तसेच साठवणूकीबाबतची माहिती या कार्यालयास वेळोवेळी सादर करणे अभिप्रेत आहे. परंतू मे. आर. व्ही. फुड प्रॉडक्ट यांनी या प्रकरणी जप्त करण्यात आलेला उडीद या कडधान्याचा साठा आयात केल्याबाबतचे या कार्यालयास मासिक विवरणपत्र सादर केले नसल्याचे आढळून आले आहे. तथापि, मे. आर. व्ही. फुड प्रॉडक्ट यांनी उपरोक्त आयात साठ्याबाबत सादर केलेल्या कायदेशीर कागदपत्रांवरुन त्यांचा आयात केलेला साठा वैध असल्याचे दिसून येते.

मे. करोडीया एक्स्पोर्ट प्रा.लि. यांच्या वतीने मनोज सिंग सोलंके यांनी केलेल्या खुलाशात, त्यांना मे. कोराडीया एक्सपोर्ट प्रा.लि. चे संचालक राजेश शांतीला पंजवानी यांनी प्राधिकृत केले असून जप्त करण्यात आलेल्या साठ्याबाबतचे सर्व कागदपत्रे निवेदनासोबत सादर केली असल्याचे सांगीतले. मे. करोडीया एक्स्पोर्ट प्रा.लि. यांनी सादर केलेल्या आयात संबंधीचे कागदपत्रांचे अवलोकन केले असता, जप्त साठ्यापैकी उडीद या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ४८५३८९५ दि. ०७/१०/२०११ रोजी २४०० बाचक्यांमध्ये १२०१.६६ क्विंटल साठा आयात केल्याचे तसेच त्यापैकी दि. २१/१०/२०११ रोजी २४०० बाचक्यांमधील ११९८.३० क्विंटल उडीद या कडधान्याचा साठा मे. त्रिमुर्ती वेअरहाऊसमध्ये साठवणूक केल्याचे आढळून आले आहे. सद्य:स्थितीत नमूद गोदामावर २४०० बाचक्यांमधील ११९८.३० क्विंटल उडीद या कडधान्याचा साठा साठवणूक केले असल्याचे सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत आहे. आयातदाराने आयात साठ्याबाबतची माहिती तसेच साठवणूकीबाबतची माहिती या कार्यालयास वेळोवेळी सादर करणे अभिप्रेत आहे. परंतू मे. करोडीया एक्स्पोर्ट प्रा.लि यांनी या प्रकरणी जप्त करण्यात आलेला उडीद या कडधान्याचा साठा आयात केल्याबाबतचे या कार्यालयास मासिक विवरणपत्र सादर केले नसल्याचे आढळून आले आहे. तथापि, मे. करोडीया एक्स्पोर्ट प्रा.लि यांनी उपरोक्त

आयात साठ्याबाबत सादर केलेल्या कायदेशीर कागदपत्रांवरुन त्यांचा आयात केलेला साठा वैध असल्याचे दिसून येते.

मे. केशव ट्रेडींग कंपनीचे मालक भावेश मुलजीभाई कतीरा यांनी केलेल्या खुलाशात, त्यांनी निवेदनासोबत मे. त्रिमुर्ती वेअर हाऊसमध्ये जप्त करण्यात आलेल्या त्यांच्या साठ्याबाबतचे सर्व आवश्यक कागदपत्रे सादर केली असल्याचे सांगीतले. मे. केशव ट्रेडींग कंपनी यांनी सादर केलेल्या आयात संबंधीचे कागदपत्रांचे अवलोकन केले असता, जप्त साठ्यापैकी तुर या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ५४५१२७० दिनांक १३/१२/२०११ रोजी २४०० बाचक्यांमध्ये ११९६.५७ क्विंटल, बिल ऑफ एन्ट्री क्र. ५५८३५५२ दिनांक २७/१२/२०११ रोजी २४०० बाचक्यांमध्ये ११९७.४५ क्विंटल व बिल ऑफ एन्ट्री क्र. ५५३९२८३ दिनांक २२/१२/२०११ रोजी २४०० बाचक्यांमध्ये ११९७.७० क्विंटल असे मिळून एकूण ७२०० बाचक्यामधील ३५९१.७२ क्विंटल साठा आयात केल्याचे तसेच त्यापैकी दिनांक ०३/०१/२०१२ रोजी ७१९८ बाचक्यांमधील ३५८५.३० क्विंटल तुर या कडधान्याचा साठा मे. त्रिमुर्ती वेअरहाऊसमध्ये साठवणूक केल्याचे आढळून आले आहे. आयात साठ्यापैकी विविध आस्थापनांना केलेल्या साठा विक्रीचे तपशिल म्हणून विक्री बिले सादर केली असून विक्री केलेला साठा वजा जाता उर्वरित शिल्लक असलेला ५२२८ बाचक्यांमधील २६२७.७० क्विंटल तुर या कडधान्याचा साठा सद्य:स्थितीत नमूद गोदामावर साठवणूक केले असल्याचे सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत आहे. आयातदाराने आयात साठ्याबाबतची माहिती तसेच साठवणूकीबाबतची माहिती या कार्यालयास वेळोवेळी सादर करणे अभिप्रेत आहे. परंतू मे. केशव ट्रेडींग कंपनी यांनी या प्रकरणी जप्त करण्यात आलेला तुर या कडधान्याचा साठा आयात केल्याबाबतचे या कार्यालयास मासिक विवरणपत्र सादर केले नसल्याचे आढळून आले आहे. तथापि, मे. केशव ट्रेडींग कंपनी यांनी उपरोक्त आयात साठ्याबाबत सादर केलेल्या कायदेशीर कागदपत्रांवरुन त्यांचा आयात केलेला साठा वैध असल्याचे दिसून येते.

शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २००८ अन्वये आयातदारांस त्यांनी आयात केलेल्या साठ्याबाबत या कार्यालयास मासिक विवरणपत्र सादर करुन अवगत करणे क्रमप्राप्त आहे. तथापि उपरोक्त नमुद आयातदारानी सुनावणीच्या दरम्यान त्यांना सदरची प्रक्रीया अवगत नसल्याचे सांगून सद्य:स्थितीत शिल्लक असलेला व यापूढील काळात आयात करण्यात येणाऱ्या साठ्याबाबत नियमीतपणे मासिक विवरणपत्र सादर करणार असल्याचे सांगून त्यांनी आयात केलेला साठा हा साठेबाजीच्या उद्देशाने साठवणूक न केल्याचे सांगून सदर साठ्याची नियमीतपणे विक्री करुन सद्य:स्थितीत नमुद गोदामावर त्यापैकीच शिल्लक

असलेला साठा हा जप्त करण्यात आलेला असल्याचे सांगीतले आहे. यावरुन आयातदारानी आयात केलेल्या साठ्याबाबतची माहिती या कार्यालयास सादर न केल्याची चुक मान्य केली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेता जप्त साठ्याच्या मालकांनी सादर केलेल्या पुरावादर्शक कागदपत्रावरुन जप्त करण्यात आलेला त्यांचा विवीध कडधान्याचा साठा हा वैध असल्याने शासन परिपत्रकानुसार आयात केलेल्या साठ्याबाबतची माहिती वेळोवेळी न चुकता या कार्यालयास सादर करण्याच्या अटीवर मे. बालाजी ट्रेडर्स यांचा सिल करण्यात आलेला १६७ बाचक्यांमधील ८७.८० क्विंटल तुर या कडधान्याचा संपूर्ण साठा, मे. कुसुम एजन्सी यांचा सिल करण्यात आलेला ३२७३ बाचक्यांमधील १६१३.३० क्विंटल तुर या कडधान्याचा संपूर्ण साठा, मे. महेश ॲग्री यांचा सिल करण्यात आलेला १४५० बाचक्यांमधील ७२९.१० क्विंटल मुग या कडधान्याचा संपूर्ण साठा, मे. आर. व्ही. फुड प्रॉडक्ट यांचा सिल करण्यात आलेला ८०० बाचक्यांमधील ४०२.०० क्विंटल उडीद या कडधान्याचा संपूर्ण साठा, मे. करोडीया एक्स्पोर्ट प्रा.लि यांचा सिल करण्यात आलेला २४०० बाचक्यांमधील ११९८.३० क्विंटल उडीद या कडधान्याचा संपूर्ण साठा तसेच मे. केशव ट्रेडींग कंपनी यांचा सिल करण्यात आलेला ५२२८ बाचक्यांमधील २६२७.७० क्विंटल तुर या कडधान्याचा संपूर्ण साठा, त्यांना परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये जप्त/सिल करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात पुढील आदेश देत आहे.

<u>आदेश</u> :-

१) प्रस्तूत प्रकरणी सिल करण्यात आलेला मे. बालाजी ट्रेडर्स यांचा १६७ बाचक्यांमधील ८७.८० क्विंटल तुर या कडधान्याचा साठा त्यांना परत करण्यात यावा.
२) प्रस्तूत प्रकरणी सिल करण्यात आलेला मे. कुसुम एजन्सी यांचा ३२७३ बाचक्यांमधील १६१३.३० क्विंटल तुर या कडधान्याचा साठा त्यांना परत करण्यात यावा.
३) प्रस्तूत प्रकरणी सिल करण्यात आलेला मे. महेश ॲग्री यांचा १४५० बाचक्यांमधील ७२९.१० क्विंटल मुग या कडधान्याचा साठा त्यांना परत करण्यात यावा.
४) प्रस्तूत प्रकरणी सिल करण्यात आलेला मे. आर. व्ही. फुड प्रॉडक्ट यांचा ८०० बाचक्यांमधील ४०२.०० क्विंटल उडीद या कडधान्याचा साठा त्यांना परत करण्यात यावा.

५) प्रस्तूत प्रकरणी सिल करण्यात आलेला मे. करोडीया एक्स्पोर्ट प्रा.लि यांचा २४०० बाचक्यांमधील ११९८.३० क्विंटल उडीद या कडधान्याचा साठा त्यांना परत करण्यात यावा.

६) प्रस्तूत प्रकरणी सिल करण्यात आलेला मे. केशव ट्रेडींग कंपनी यांचा ५२२८ बाचक्यांमधील २६२७.७० क्विंटल तुर या कडधान्याचा साठा त्यांना परत करण्यात यावा.

७) केंद्र शासनाच्या अधिसुचनाव्दारे निर्गमित करण्यात आलेल्या सुचनांनुसार तसेच दिनांक २० मे, २००८ रोजीच्या शासन परिपत्राकानुसार आयात केलेल्या साठ्याबाबतची माहिती उपरोक्त आयातदारांनी वेळोवेळी न चुकता या कार्यालयास सादर करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मे. त्रिमुर्ती वेअर हाऊस चे मालक जयसिंग बाळू बाबर
२) मे. करोडीया एक्स्पोर्ट प्रा.लि. चे मालक
३) मे. आर. व्ही. फुड प्रॉडक्ट चे मालक
४) मे. केशव ट्रेडींग कंपनी चे मालक
५) मे. कुसुम एजन्सी चे मालक
६) मे. बालाजी ट्रेडर्स चे मालक
७) मे. महेश ॲग्री चे मालक
(उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांचे मार्फत)

प्रत,

१) उपनियंत्रक शिधावाटप, फ-परिमंडळ, ठाणे यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव.

३) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

D:\user E\Amaldata-2012\Ammal Aadesh\Aadesh.doc